# प्रेस नोट

परभणी जिल्ह्याचा साहित्य आणि कला क्षेत्रातील वारसा लक्षात घेऊन मा. श्री. पी. शिवशंकर (भा.प्र.से) जिल्हाधिकारी परभणी यांच्या संकल्पनेतून आणि मा. श्री. अंकूश पिनाटे, निवासी उपजिल्हाधिकारी परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली परभणी जिल्हा सेतू समिती, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी तर्फे भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील नागरीकांसाठी निबंध लेखन स्पर्धा आयोजित केली आहे.

सदर स्पर्धेसाठी दिनांक १५ ऑगस्ट २०१९ ते १५सप्टेंबर २०१९ पर्यंत प्रवेशिका फक्त ऑनलाईन Online पद्धतीने स्विकारण्यात येणार असून त्याकरीता जिल्हा प्रशासनाने श्री. सुनिल पोटेकर, तांत्रिक संचालक तथा डि.आय.ओ एन.आय.सी. यांच्या मदतीने एक स्वतंत्र पोर्टल विकसीत केले आहे.

***स्पर्धेचा विषय :***

(निबंधलेखन) स्पर्धा: **'<u>परभणी जिल्हयातील साहित्य आणि कला क्षेत्रातील प्रभावी व्यक्तीमत्वे</u>'**

**स्पर्धेच्या नियम व अटी :**

१. स्पर्धेसाठी प्रवेशिका फक्त ऑनलाईन Onlineपद्धतीनेच स्विकारण्यात येतील.

२. आपल्या "यूजर आयडी" आणि "पासवर्ड"ची सुरक्षीतता आणि गोपनियता ही स्पर्धकाची जबाबदारी आहे.

३. एका स्पर्धकास निबंध स्पर्धेसाठी जास्तित जास्त दोन फाईल दाखल करता येतील.

४. स्पर्धा केवळ मराठी भाषेतच घेण्यात येणार असल्याने इतर भाषेत पाठवीलेल्या प्रवेशपत्रिकांचा विचार केला जाणार नाही.

५. निबंधस्पर्धेसाठी ९०० शब्दांची शब्दमर्यादा आहे.

६. ठरवून दिलेया वेळापत्रकाप्रमाणेच प्रवेशिका ऑनलाईन Online पद्धतीने स्विकारल्या जातील प्रवेशिका स्विकारण्याच्या कालावधीनंतर ऑनलाईन Online सॉफ्टवेअर बंद होईल त्यानंतर कोणत्याही माध्यमातून प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत.

७. संकेतस्थळ बंद असणे / इंटरनेट स्पीड नसणे / ऑनलाईन भरतांना आलेल्या त्रुटी अशा कोणत्याही कारणास्तव ऑनलाईन व्यतीरीक्त प्रवेशिका स्विकारण्यात येणार नाहीत.

८. स्पर्धेतील सहभागाविषयी ईमेल किंवा दुरध्वनीवर कोणत्याही प्रकारची तक्रार स्विकारण्यात येणार नाही. त्यासाठी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

९. निबंध स्पर्धेसाठी पाठविलेला निबंध फक्त पीडीएफ फॉर्मेट (PDF) मध्येच स्विकारण्यात येईल.

१०. स्पर्धकाकडून इतरांच्या कलाकृतीचे कॉपीराईट उल्लंघन झाल्यास त्याला सेतू समिती जबाबदार असणार नाही.

११. स्पर्धेसाठी दाखल केलेले साहित्य आणि छायाचित्र यावर सेतू समिती आणि जिल्हाधिकारी, परभणी यांचा संपुर्ण अधिकार राहील. हे साहित्य आणि कलाकृती कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यात स्पर्धकाचा कोणताही हस्तक्षेप असणार नाही.

१२. स्पर्धेसाठी पात्र स्पर्धकांची यादी आणी स्पर्धेचा निकाल www.collectorpbn.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. विजेत्या स्पर्धकास मोबाईल व ईमेल द्वारे वैयक्तिक कळविण्यात येईल.

१३. मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत स्पर्धा परीक्षणासाठी तज्ञ परीक्षकांचे पॅनेल नियुक्तकेले जाणार आहे या तज्ञ परीक्षकांची नावे स्पर्धेचा निकाल लागल्यानंतर संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील. या विषयी सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष सेतू समिती यांच्या कडे असतील.

१४. स्पर्धेच्या नियम व अटी तसेच स्पर्धेचा कालावधी, निकालाचे दिनांक यात आयत्यावेळी बदल करण्याचे सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष सेतू समिती यांना राखुन ठेवलेले आहेत.

**मार्गदर्शक सूचना**

सहभागासाठी प्रथम स्पर्धकाने या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करण्यासाठी New Registration या ऑपशनला क्लिक केल्यानंतर आपले नाव आणि इतर माहिती नोंदवा.

**ऑनलाईन प्रवेशिका सादर करण्याची पद्धती :**

१. ऑनलाईन सहभागासाठी www.collectorpbn.in किंवा www.parbhani.gov.in यासंकेतस्थळाला भेट द्यावी.

२. सहभागासाठी प्रथम स्पर्धकाने या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करण्यासाठी New Registration या ऑप्शनला क्लिक केल्यानंतर आपले नाव आणि इतर माहिती भरावी.

३. आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल ही माहिती भरणे बंधनकारक आहे.

४. नोंदणी पुर्ण झाल्यानंतर आपल्याला ई-मेलद्वारे स्वतंत्र "यूजर आयडी" आणि "पासवर्ड" कळविण्यात येईल.

५. आपणास प्राप्त "यूजर आयडी" आणि "पासवर्ड" वापरुन प्रणालीत प्रवेश करावा.

६. आपणास सहभागी व्हावयाचे असलेल्या स्पर्धेच्या नावापुढे "Participate" ऑपशन पुढील चेक बॉक्स क्लिक करा.

७. आपला निबंध असलेली पीडीएफ (PDF) किंवा जेपीईजी (JPEG) फाईल समाविष्ठ करण्यासाठी "Choose File" या ऑपशनला क्लिक करा.

८. समाविष्ठ करण्याची फाईल निवडा

९. त्यानंतर "Submit" बटनला क्लिक करा.

१०. एकापेक्षा अधिक फाईल समाविष्ठ करण्यास स्टेप क्रमांक ७, ८ व ९ पुन्हा करा.

**स्पर्धा निकाल** ०:- www.collectorpbn.in किंवा www.parbhani.gov.in यासंकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल.

**स्पर्धा पारितोषक ०:-**

- निबंध स्पर्धा मध्ये प्रथम येणा-या व्यकतीस 2000/- रु आणि प्रमाणपत्र व व्दीतीय येणा-या व्यक्तीस 1000/- रु प्रमाणपत्र आणि तृतीया येणा-या व्यक्तीस ५००/- रु आणि प्रमाणपत्र मा.जिल्हाधिकारी यांचे शूभ हस्ते वितरण समारंभ होईल.

Dsc sign
(अंकूश पिनाटे)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**परभणी**

Signature valid

Digitally signed by ... USH
BHANUDAS PIN...
Date: 2... 08.1... :03:12 IST
Reason: ...